-: प्रेसनोट दिनांक - ०७/०८/२०२६ :-

| अ.क्र. | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| १ | घटक | ला.प्र.वि.कोल्हापूर |
| २ | तक्रारदार | पुरूष , वय ५७ वर्षे, व्यवसाय - बेकरी दुकान |
| ३ | आरोपी | १) संतोष विश्वास साळुंखे, वय - ४३ वर्षे, पो.हे.कॉ.ब.नं.२३९४ नेमणुक कुरूंदवाड पोलीस ठाणे, रा.शिवराज कॉर्नर, कबनुर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर<br>२)फिरोज पापालाल विजापुरे, वय - ४० वर्षे (खाजगी इसम) रा. हेरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर<br>३) जमीर सलिम पठाण, वय ४१ वर्षे, (खाजगी इसम) रा.करूंदवाड, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर |
| ४ | तक्रार | यातील तक्रारदार यांचे विरूध्द कुरूंदवाड पोलीस ठाणे येथे अर्ज आला आहे. सदर अर्जाचे चौकशी कुरूंदवाड पोलीस ठाणे येथील पोलीस हेड कॉन्स्टेबल संतोष साळुंखे यांचेकडे असुन त्यांनी तक्रारदार यांना अर्ज चौकशीकामी पोलीस ठाणेत बोलावुन घेवुन सदर अर्जात मदत करायची असेल तर १,५०,०००/- रूपये दया नाहीतर तुमच्यावर गुन्हा दाखल करतो असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना पैशाची जुळणा झाले नंतर भेटतो असे सांगितले होते. त्यानंतर तक्रारदार व पोलीस साळुंखे यांचे ओळखीचा इसम नामे फिरोज विजापूरे हा तक्रारदार यांना भेटुन पोलीस साळुंखे साहेब यांनी सांगितलेल्या दिड लाख रूपये कधी देणार आहेस असे तक्रारदार यांना विचारले त्यावेळी तक्रारदार यांनी त्याला काहीतरी कमी करायला पाहीजे असे म्हणाले. त्यावेळी त्याने साळुखे साहेबांना सांगुन काहीतरी कमी करूया उदया साहेबाला विचारून तुम्हाला सांगतो असे म्हणाले होते. तक्रारदार यांच्याकडे पोलीस साळुंखे व खाजगी इसम फिरोज विजापुरे हे लाचेची मागणी करीत असल्याने तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तक्रार दिलेली होती. |
| ५ | तक्रारीची पडताळणी | ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणी मध्ये तक्रारदार यांचेविरूध्द आलेल्या अर्जाची चौकशी पो.हे.कॉ.साळुंखे हे करीत असुन त्यांनी तक्रारदार यांच्याकडे अर्ज चौकशीमध्ये मदत करतो म्हणुन तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती १,००,०००/- रूपये लाचेची मागणी करून मागणी केलेली लाच रक्कम थोडयावेळाने आणुन दे असे म्हणाल्याचे तसेच खाजगी इसम फिरोज पापालाल विजापुरे यांनेही तक्रारदार यांना पो.हे.कॉ. सांळुखे यांच्यासाठी १,००,०००/- रूपयांची मागणी केली तसेच खाजगी इसम जमीर सलिम पठाण याने तक्रारदार यांना पो.हे.कॉ. साळुंखे यांना पैसे दे म्हणुन प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. |
| ६ | सापळा कार्यवाही | त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता, पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक संतोष विश्वास साळुंखे, वय - ४३ वर्षे, पो.हे.कॉ. करूंदवाड पोलीस ठाणे यांनी १,००,०००/- रूपये लाच स्विकारलेने, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक १) संतोष विश्वास साळुंखे, वय - ४३ वर्षे, पो.हे.कॉ.करूंदवाड पोलीस ठाणे, रा.शिवराज कॉर्नर, कबनुर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर २) फिरोज पापालाल विजापुरे, वय - ४० वर्षे (खाजगी इसम) रा. हेरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर ३) जमीर सलिम पठाण, वय ४१ वर्षे, (खाजगी इसम) रा.कुरूंदवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द कुरूंदवाड पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे. |
| ७ | गुन्हा रजिस्टर नं./कलम /पोलीस स्टेशन/जिल्हा/ दिनांक व वेळ | कुरूंदवाड पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे भ्र.प्र.का.क.७, ७अ, १२ प्रमाणे गुन्हा नोंद प्रकिया चालु आहे. |

| | | |
|---|---|---|
| ८ | आरोपी अटक दिनांक व वेळ | आरोपींना ताब्यात घेतले आहे. |
| ९ | सापळा अधिकारी | राजेंद्र सानप, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.कोल्हापूर , मो.नं.८२०८९७१२०७ |
| १० | पर्यविक्षक अधिकारी | वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.कोल्हापूर, मो.नं. ९७६४१४०७७७ |
| ११ | सापळा पथक | प्रकाश भंडारे, स.पो.फौ., संदिप काशीद, पो.हे.कॉ., सचिन पाटील, पो.हे.कॉ.कृष्णा पाटील पो.कॉ. रविंद्र पाटील,पो.कॉ.,गजानन कुराडे चा.स.पो.फौ. ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे. |
| १२ | मार्गदर्शन | श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. मो.नं. ९८२३१६७१५४ श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मो.नं ८३९००२६५४९ यांचे मार्गदर्शनानुसार |

१३ लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करणेत येते की, भ्रष्टाचारसंबधी काही माहिती अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमुद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

| | घटक कार्यालय | परिक्षेत्र कार्यालय | लाप्रवि मुख्यालय |
|---|---|---|---|
| | १ | २ | ३ |
| पत्ता | पोलीस उपअधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर २१२० सी वार्ड, शनिवार पेठ, कोल्हापूर ४१६००२ | पोलीस अधीक्षक/ पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र,सी बरॅक, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,पुणे ४११००१ | सर पोचखानवाला मार्ग वरळी मुंबई - ४०००३० |
| दुरध्वनी कमांक व्हाम्टसअप कमांक १०६४ | ०२३१/२५४०९८९.<br>९४०४३२१०६४<br>९७६४१४०७७७ | ०२०/२६१२२१३४<br>०२०/२६१३२८०२<br>०२०/२६०५०४२३ | ०२२- २४९२१२१२ |
| ई मेल आयडी | dyspacbkolapur@gmail.com | | acbwebmail@mahapolice.gov.in |